Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे
। रविवार, दि. १२ एप्रिल २०२६ । वर्ष १ । अंक ५ । पाने २।
DIGITAL EDITION



"शरद पवारांचा तो लेख अत्यंत चुकीचा"
(पान २ वर)

Selected

### अमेरिका-इराण युद्धविरामादरम्यान चीनची मोठी खेळी?

नवी दिल्ली : मेरिका-इराणमधील युद्ध अखेर ८ एप्रिल रोजी थांबलं असून आता या युद्धाच्या शांतता कराराबाबत पाकिस्तानच्या इस्लामाबादमध्ये चर्चा पार पडत आहेत. या महत्वाच्या बैठकीसाठी अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जे.डी. व्हान्स आणि इराणचं शिष्टमंडळ पाकिस्तानमध्ये दाखल झालं आहे. त्यामुळे आता अमेरिका-इराणमध्ये काय करार होणार? कोणत्या अटी असणार? याकडे जगाचं लक्ष लागलं आहे. या घडामोडी सुरू असतानाच अमेरिकेच्या गुप्तचर यंत्रणेने केलेल्या एका दाव्यामुळे पुन्हा एकदा मोठी खळबळ उडाली आहे. इराणला येत्या काही आठवड्यांत चीनकडून नवीन हवाई संरक्षण प्रणाली मिळण्याची शक्यता असल्याचा दावा अमेरिकेच्या गुप्तचर यंत्रणेने केला असल्याचं वृत्त सीएनएनने दिलं आहे. मात्र, अमेरिकेच्या गुप्तचर यंत्रणेचा हा दावा चीनने फेटाळून लावला आहे. अमेरिकेतील चिनी दूतावासाने म्हटलं की, "चीनने संघर्षातील कोणत्याही पक्षाला कधीही शस्त्रे पुरवलेली नाहीत. आम्ही अमेरिकेला आवाहन करतो की त्यांनी निराधार आरोप करणं, द्वेषपूर्ण संबंध जोडणं आणि सनसनाटी निर्माण करणं टाळावं. आम्हाला आशा आहे की संबंधित पक्ष तणाव कमी करण्यासाठी अधिक प्रयत्न करतील."

मनाची तरलता जिवंत ठेवण्यासाठी साहित्याची निर्मिती करत रहावे

# तंत्रज्ञानाच्या पुढे मानवाला वाटचाल करणे आवश्यक!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आवाहन

जन सम्राट टाईम्स

नवी दिल्ली : कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आव्हानाच्या काळामध्ये तंत्रज्ञानाच्या पुढे मानवाला वाटचाल करणे आवश्यक आहे. त्यामुळे पुढचे एखादे संमेलन यंत्रमानवांचेही घ्यावे लागू शकते. तथापि तंत्रज्ञानापेक्षा माणूस कायम अग्रेसर राहणे आवश्यक आहे. साहित्य व्यक्तिमत्त्वाला यंत्रमानव होऊ देत नाही, मनाची तरलता जिवंत ठेवण्यासाठी साहित्याची निर्मिती करत रहावे, असे आवाहनही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस त्यांनी शनिवारी केले. महिला प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या पहिल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. फायलींमध्ये हरवून जाणाऱ्या प्रशासकीय महिला अधिकाऱ्यांच्या



या साहित्य संमेलनांनानी भावविश्वाला सांभाळण्याचे काम या साहित्य संमेलनातून झाले आहे. 'निर्णयार्थ सादर' अशा प्रशायकीय शेऱ्यापेक्षा कविता आणि कादंबऱ्यामधून प्रगत होणारी ही भाषा संवेदनशील आणि तरल आहे. त्यामुळे खरोखर आनंद होत आहे. यावेळी त्यांनी महिलांच्या मल्टीटास्किंग कौशल्याचे कौतुक करताना महिला अधिकारी दिलेल्या जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडतात असे सांगितले. महायुतीच्या कार्यकाळातच राज्याला महिला उपमुख्यमंत्री मिळाल्या. मुख्य सचिवांपासून तर, मुंबई महानगरपालिका आयुक्तांपर्यंत अनेक महत्त्वाच्या पदांवर महिलांची वर्णी लागल्याचेही फडणवीस यांनी सांगितले. पशु-पक्षी राजकीय कार्यकर्त्यांप्रमाणे 'झिंदाबाद'चे नारे लावू शकत नाहीत; केंद्रीय राज्यमंत्री बघेल म्हणाले, 'अमेरिकेने कर लावला तरी...'

महाराष्ट्र सदनातील या संमेलन स्थळाला छत्रपती महाराणी ताराराणी दालन नाव देण्यात आले आहे. ताराराणी यांच्या ३५१ व्या जयंतीनिमित्ताने या संमेलनाचे आयोजन करणयात आले आहे. या उद्घाटन सोहळ्याला राज्याचे मराठी भाषा मंत्री उदय सामंत, संमेलनाध्यक्ष ज्येष्ठ लेखिका माजी अतिरिक्त मुख्य सचिव लीना मेहंदळे, माजी पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, सहमहालेखा नियंत्रक सुप्रिया देवस्थळी, महाराष्ट्र सदनच्या निवासी आयुक्त व सचिव आर. विमला आदी उपस्थित होते. कोणत्याही भाषेमध्ये होणाऱ्या साहित्य संमेलनापेक्षा मराठीत होणारी संमेलने सर्वाधिक आहेत. झाडीपट्टीपासून ते विद्रोही साहित्य संमेलनापर्यंत हा साहित्यिकांचा मेळा सर्वाधिक मराठीत फुलतो, असे फडणवीस म्हणाले.

### 'पवारांचा वारकरी संप्रदायाशी संबंध नाही'

राज्याच्या विकासात शरद पवारांचे मोठे योगदान असले तरी त्यांचा वारकरी संप्रदायाशी काहीही संबंध राहिलेला नाही, असा टोला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांना लगावला. महिला प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या साहित्य संमेलनाच्या उद्घाटनानंतर पत्रकारांशी फडणवीस यांनी संवाद साधला. या संमेलनाच्या सौदामिना या स्मरणिकेमधील लेखामध्ये शरद पवार यांनी वारकरी संप्रदायावर टिप्पणी केली आहे. त्याला फडणवीस यांनी प्रत्युत्तर दिले.

जन सम्राट टाईम्स | विशेष बातमी

# गाळयुक्त शिवार योजनेची व्याप्ती वाढवणार!

## एकनाथ शिंदे यांची घोषणा

जन सम्राट टाईम्स

सातारा : गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार ही योजना शेतकऱ्यांसह धरण क्षेत्रातील लाभार्थ्यांना खूप उपयोगी आहे. या योजनेची व्याप्ती राज्यात वाढवणार असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालय व नाम फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने कोयना धरणातील गाळ काढण्याचा कार्यक्रम हाती घेतला आहे. याचा शुभारंभ दरे (ता. महाबळेश्वर) येथे उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते झाला. यावेळी जिल्हाधिकारी संतोष पाटील, उपवनसंरक्षक अमोल सातपुते, वाईचे प्रांताधिकारी डॉ. योगेश खरमाटे, सातारचे प्रांताधिकारी आशिष बारकुल यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. उन्हाळ्यामध्ये धरणाची पाणी पातळी कमी होते.

पाणी पातळी कमी झाल्यामुळे धरणातील गाळ काढल्यानंतर पाण्याची क्षमता ही वाढते व गाळाचा उपयोग शेतीमध्ये केला जातो. यामुळे शेती अधिक सुपीक व कृषी उत्पन्न जास्त देते. त्यामुळे ही योजना शेतकऱ्यांसह धरण क्षेत्रातील लाभार्थ्यांसाठी फार महत्त्वाची आहे. महाराष्ट्राला भीकमुक्त, भूकमुक्त करण्यासाठी अन्न आयोगाच्या आठ महत्त्वाच्या शिफारशी तरी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी धरणांमधील व तलावांमधील गाळ काढून तो आपल्या शेतात टाकावा व आपली शेतजमीन सुपीक करून कृषी उत्पन्न वाढवावे, असे आवाहनही उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी केले. प्रारंभी महात्मा जोतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. वासोटा परिसराची पाहणी उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दरे



दौऱ्यादरम्यान कोयना जलाशयात बोटीद्वारे विहार करून ऐतिहासिक महत्त्व असलेल्या किल्ले वासोटा परिसराची पाहणी केली. या निसर्गसंपन्न परिसरात आगामी काळात 'नाईट टुरिझम' आणि पाण्यातील रुग्णवाहिका (वॉटर ॲम्बुलन्स) सुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजन असल्याचे त्यांनी या वेळी सांगितले. कोयनेच्या पर्यटनाला चालना देण्यासाठी हे पाहणी दौरे करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

### वासोटा परिसराची पाहणी

महाराष्ट्राला भीकमुक्त, भूकमुक्त करण्यासाठी अन्न आयोगाच्या आठ महत्त्वाच्या शिफारशी तरी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी धरणांमधील व तलावांमधील गाळ काढून तो आपल्या शेतात टाकावा व आपली शेतजमीन सुपीक करून कृषी उत्पन्न वाढवावे वासोटा परिसराची पाहणी उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दरे दौऱ्यादरम्यान कोयना जलाशयात बोटीद्वारे विहार करून ऐतिहासिक महत्त्व असलेल्या किल्ले वासोटा परिसराची पाहणी केली. या निसर्गसंपन्न परिसरात आगामी काळात 'नाईट टुरिझम' आणि पाण्यातील रुग्णवाहिका (वॉटर ॲम्बुलन्स) सुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजन असल्याचे त्यांनी या वेळी सांगितले.

# ज्येष्ठ पार्श्वगायिका आशा भोसले रुग्णालयात दाखल

जन सम्राट टाईम्स

मुंबई : ज्येष्ठ पार्श्वगायिका आशा भोसले यांना शनिवारी प्रकृती अस्वास्थ्यामुळे दक्षिण मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले. ९२ वर्षीय आशा भोसले यांच्यावर ब्रीच कँडी रुग्णालयात उपचार सुरू आहेत, मात्र त्यांच्या प्रकृती अस्वस्थ्याचे नेमके कारण रात्री उशिरापर्यंत समजू शकले नाही. गेली आठ दशकांहून अधिक काळ भारतीय चित्रपट



संगीतसृष्टीतील अलौकिक व्यक्तिमत्व म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आशा भोसले वयाची नव्वदी उलटल्यावरही त्याच उत्साहाने कार्यरत आहेत. नव्वदाव्या वर्षी देशभरात विविध ठिकाणी झालेल्या कार्यक्रमातून आपली गाणी सादर करत त्यांनी रसिकांची मने जिंकली. गेल्या वर्षी फेब्रुवारीमध्ये मराठी भाषा दिनानिमित्त मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमातही त्या सहभागी झाल्या होत्या. या कार्यक्रमात रोजच्या बोलण्यात शुध्द मराठी भाषा असावी, यासाठी सगळ्यांनी प्रयत्न केले पाहिजेत, असे आग्रही मत त्यांनी व्यक्त केले होते. गेले काही महिने त्या सार्वजनिक कार्यक्रमांमधून फारशा दिसत नव्हत्या.

# शिकवणी वर्गात अल्पवयीन विद्यार्थ्याचे लैंगिक शोषण; कर्मचारी अटकेत

जन सम्राट टाईम्स

पुणे : -शहरातील मार्केट यार्ड परिसरातील गंगाधाम येथील नामांकित 'मनशील ॲकॅडमी'मध्ये अल्पवयीन विद्यार्थ्याचे लैंगिक शोषण झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी मार्केट यार्ड पोलिसांनी विकास दिलीप गायकवाड (वय ३०) या कर्मचाऱ्याला अटक केली असून, पुढील तपास सुरू आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी गायकवाड हा गेल्या तीन महिन्यांपासून संबंधित विद्यार्थ्याचे शारीरिक शोषण करत होता. हा प्रकार शिकवणी वर्गाच्या परिसरातच सुरू असल्याचे समोर आले आहे. विशेष म्हणजे, आरोपीने या कृत्याचे मोबाईलवर चित्रीकरण देखील केले होते. या व्हिडिओच्या आधारे पीडित विद्यार्थ्याला ब्लॅकमेल करण्यात आले का, याचाही तपास पोलीस करत आहेत. आणखी काही पुरावे हाती लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या प्रकरणी ॲकॅडमीच्या मालकांवर किंवा व्यवस्थापनावर अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आलेली नसल्याने पालकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. संबंधित संस्थेची जबाबदारी निश्चित करून कठोर कारवाई करण्याची मागणी पालकांकडून होत आहे. या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली असून, विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज

# इंधन संकट टळलं, समुद्रात पुन्हा मोठा खेळ

## 'होर्मूज'वर तणाव कायम

जन सम्राट टाईम्स

**मुंबई** : अमेरिका आणि इराण यांच्यात वाढलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर दोन्ही देशांनी पुढील दोन आठवड्यांसाठी युद्धविराम जाहीर केला आहे. मात्र युद्धविरामानंतरही परिस्थिती पूर्णतः स्थिर झालेली नसून, विविध अटी-शर्तींमुळे तणाव कायम असल्याचे दिसून येत आहे. सध्या पाकिस्तानमध्ये दोन्ही देशांदरम्यान वाटाघाटी सुरू आहेत. चर्चेदरम्यान इराणने अमेरिकेसमोर काही महत्त्वाच्या अटी ठेवल्या आहेत. आखाती देशांमध्ये अमेरिकेकडून जप्त करण्यात आलेली इराणची मालमत्ता मुक्त करावी, तसेच लेबानॉन वर सुरू असलेले हल्ले थांबवावेत, अशी मागणी इराणने केली आहे. मात्र अमेरिकेने ही संपत्ती सोडण्यास नकार दिल्याने चर्चेत अडथळे निर्माण झाले आहेत.

त्यामुळे युद्धविराम टिकणार का, याबाबत साशंकता व्यक्त केली जात आहे. दुसरीकडे, अमेरिकेने युद्धविरामाच्या बदल्यात इराणसमोर स्ट्रेट ऑफ हॉर्मुझ वाहतुकीसाठी तातडीने खुला करण्याची अट ठेवली होती.

मात्र युद्धविरामानंतरही इराणने या सामुद्रधुनीवरील निर्बंध पूर्णपणे हटवलेले नाहीत. दिवसाला केवळ १५ जहाजांना मार्ग देण्याचा निर्णय घेतल्यामुळे जागतिक इंधन



### अर्थव्यवस्थेवर परिणाम

सदर जहाज सुमारे २० हजार टन एलपीजी घेऊन येत असून त्याची एकूण वहन क्षमता २६ हजार टन इतकी आहे. इराणने होर्मूज मार्गावर निर्बंध आणल्यानंतर बाहेर पडणारे हे भारताचे नववे जहाज आहे. मात्र अजूनही सुमारे १५ जहाजे या मार्गावर अडकून असल्याची माहिती समोर आली आहे. जागतिक स्तरावर पाहता स्ट्रेट ऑफ हॉर्मुझ हा तेल वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाचा मार्ग मानला जातो. त्यामुळे येथे निर्माण झालेला तणाव जागतिक अर्थव्यवस्थेवर थेट परिणाम करणारा ठरतो. सध्या सुरू असलेल्या युद्धविराम चर्चेचा निकाल काय लागतो.

पुरवठ्यावर परिणाम होत असून, तेल बाजारातील अनिश्चितता कायम आहे. या पार्श्वभूमीवर इंडियासाठी काहीसा दिलासादायक घडामोड समोर आली आहे. 'जग विक्रम' नावाच्या भारतीय जहाजाने होर्मूजची सामुद्रधुनी यशस्वीरीत्या पार केली आहे.

# नितीश कुमार अखेर 'या' दिवशी देणार राजीनामा

जन सम्राट टाईम्स

मुंबई : गेल्या काही दिवसांपासून बिहारच्या राजकारणात मोठ्या घडामोडी सुरू आहेत. नितीश कुमार यांनी राज्यसभेच्या खासदारकीची शपथ घेतली आहे. मात्र, नितीश कुमार राज्यसभेचे सदस्य झाले असले तरी अद्याप त्यांनी बिहारच्या मुख्यमंत्री पदाचा राजीनामा दिलेला नाही. पण आता नितीश कुमार यांच्या राजीनाम्याची तारीख जवळपास निश्चित झाल्याची माहिती समोर आली असून १४ एप्रिलनंतर बिहारला नवे मुख्यमंत्री मिळण्याची शक्यता आहे. नितीश कुमार यांनी राजीनामा दिल्यानंतर बिहारच्या मुख्यमंत्रीपदी कोणाची वर्णी लागणार? याकडे सर्वांचंच लक्ष लागलं आहे. नितीश कुमार यांनी राजीनामा दिल्यानंतर भाजपासाठी मार्ग मोकळा होणार आहे. या घडामोडींबाबत कोणत्याही वरिष्ठ नेत्याने अधिकृतपणे भाष्य केलेलं नाही. मात्र, राजकीय वर्तुळात वेगवेगळ्या चर्चा सुरू आहेत. नितीश कुमार यांचं पाटणाच्या राजकीय पटलावरून निवृत्त होणं हा एक मोठा ऐतिहासिक बदल मानला जात आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक उत्सव समितीचे अध्यक्ष मुकुंद सपकाळे यांच्यावर हल्ला

जन सम्राट टाईम्स

जळगाव : डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक उत्सव समितीचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र जनक्रांती मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष मुकुंद सपकाळे यांच्यावर अज्ञात हल्लेखोरांनी शनिवार दि. ११ एप्रिल रोजी दुपारी ३ वाजेच्या सुमारास जीवघेणा हल्ला केला आहे. या हिंसक घटनेत सपकाळे यांच्या चारचाकी वाहनाची भीषण तोडफोड करण्यात आली असून, स्वतः सपकाळे हे या हल्ल्यात जखमी झाले आहेत. विशाल अहिरे नावाच्या गुन्हेगाराने त्याच्या साथीदारांच्या मदतीने एक कृत्य केल्याचे मुकुंद सपकाळे यांनी माध्यमांना सांगितले आहे. शनिवारी दुपारच्या सुमारास मुकुंद सपकाळे हे आपल्या नियोजित कामासाठी गोविंदा रिक्षा स्टॉप पासून रिंग रोड मार्गे बहिणाबाई उद्यान चौकात जात असताना, हल्लेखोरांच्या एका टोळक्याने त्यांना हॉटेल सायली जवळ अडवले. बॅनर छपाईच्या कारणावरून झालेल्या वादाचे रूपांतर अचानक हिंसक वळणात झाले. हल्लेखोरांनी



लाठ्या-काठ्या आणि शस्त्रांच्या सहाय्याने त्यांच्या वाहनावर हल्ला चढवला. हल्लेखोरांनी सपकाळे यांच्या चारचाकी वाहनाच्या सर्व बाजूने काचा फोडून वाहनाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान केले आहे. वाहनाची तोडफोड केल्यानंतर हल्लेखोरांनी सपकाळे यांना लक्ष्य केले, ज्यामध्ये ते जखमी झाले आहेत. हल्ला होताच परिसरात आरडाओरड झाल्याने स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. नागरिकांचा वाढता हस्तक्षेप पाहून हल्लेखोर तिथून पसार झाले. सध्या त्यांच्यावर उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली आहे. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळाचा पंचनामा केला. हल्ल्यामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

जन सम्राट टाईम्स | अँकर न्यूज

# भाजपमध्ये 'इनकमिंग'ला ब्रेक? खासदारांसाठी नो-एंट्रीची चर्चा

## 'ऑपरेशन टायगर-तुतारी'च्या चर्चेत नवा ट्विस्ट; वाढ झाली तर एनडीएचीच – भाजप नेत्याचे संकेत

जन सम्राट टाईम्स

मुंबई : राज्यात सुरू असलेल्या 'ऑपरेशन टायगर' आणि 'ऑपरेशन तुतारी'च्या चर्चांदरम्यान राजकीय वर्तुळात आणखी एक मोठी घडामोड समोर आली आहे. दुसऱ्या पक्षातील खासदारांना भाजपमध्ये प्रवेश दिला जाणार नाही, असा महत्त्वपूर्ण संकेत पक्षातील एका वरिष्ठ नेत्याने खासगी चर्चेत दिल्याची माहिती पुढे आली आहे. त्यामुळे संभाव्य पक्षांतरांच्या चर्चांना नवा कलाटणी मिळाली आहे. सध्या राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) आणि शिवसेना (ठाकरे गट) यांतील काही खासदार फुटण्याच्या चर्चा जोरात आहेत. हे खासदार शिवसेना शिंदे गटात प्रवेश करतील किंवा थेट भाजपच्या संपर्कात आहेत, असेही बोलले जात होते. मात्र या सर्व पार्श्वभूमीवर भाजपकडून आलेल्या संकेतांमुळे या चर्चांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

भाजपच्या एका बड्या नेत्याने खासगीत स्पष्ट केल्याचे सांगितले जात आहे की, "खासदारांची संख्या वाढली तर ती एनडीएची वाढेल, भाजपची नाही.

" याचा अर्थ, इतर पक्षातील खासदारांना थेट भाजपमध्ये



प्रवेश देण्याऐवजी त्यांना सहयोगी पक्षांत सामावून घेण्याची रणनीती आखली जात असल्याची शक्यता व्यक्त होत आहे.

या विधानामुळे सध्या सुरू असलेल्या 'ऑपरेशन'च्या चर्चांना मोठा धक्का बसला आहे. कारण आतापर्यंत या संभाव्य पक्षांतरांमुळे भाजपची ताकद वाढेल, असा अंदाज व्यक्त केला जात होता. मात्र आता भाजपने स्वतःसाठी 'नो-एंट्री'ची भूमिका घेतल्याचे दिसत असल्याने राजकीय समीकरणे बदलण्याची चिन्हे आहेत.दरम्यान, शिवसेना ठाकरे गटातील खासदार शिंदे गटात प्रवेश करणार असल्याच्या चर्चांवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही स्पष्ट भूमिका घेतली आहे. "अशी कोणतीही घडामोड घडणार नाही," असे सांगत त्यांनी या बातम्या फेटाळून लावल्या आहेत.

### गुप्त बैठकींच्या चर्चांमुळे तापले

राज्यातील राजकारण सध्या अफवा, दावे-प्रतिदावे आणि गुप्त बैठकींच्या चर्चांमुळे तापलेले असताना, भाजपच्या या भूमिकेमुळे पुढील काळात पक्षांतरांची दिशा नेमकी काय असेल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. एकूणच, 'इनकमिंग'वर मर्यादा घालण्याचा भाजपचा संभाव्य निर्णय आणि सहयोगी पक्षांच्या माध्यमातून ताकद वाढवण्याची रणनीती हे आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महत्त्वाचे ठरणार आहे.

Selected

## आरटीई प्रवेशाची निवड यादी जाहीर

मुंबई : बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ नुसार, दरवर्षीप्रमाणे २५ टक्के प्रवेश प्रक्रिया संपूर्ण राज्यात ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येत आहे. १० एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी पोर्टलवर निवड यादी व प्रतीक्षायादी घोषित करण्यात आली. त्यानुसार राज्यभरातून आलेल्या २ लाख ८९ हजार २८६ अर्जांमधून १ लाख ५ हजार ८११ विद्यार्थ्यांची निवड झाली. तर ८६ हजार ३४ विद्यार्थी प्रतीक्षायादीत आहेत.आरटीई २५ टक्के ऑनलाईन प्रक्रियेअंतर्गत पात्र शाळांची नोंदणी पूर्ण झाल्यानंतर बालकांच्या पालकांकडून ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रकिया १७ फेब्रुवारी ते ३१ मार्च २०२६ दरम्यान राबविण्यात आली होती. राज्यभरातील ८ हजार ७०१ शाळांमधील १ लाख १४ हजार ८२६ जागांसाठी २ लाख ८९ हजार २८६ अर्ज आले होते.

# हक्काचा प्रत्येक मतदार सुरक्षित ठेवा

## प्रत्येक बूथ भक्कम करण्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचे निर्देश

जन सम्राट टाईम्स



**पाळधी/धरणगाव /जळगाव:** आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतदार यादी शुद्धीकरण हे केवळ एक अभियान नसून ती संघटनात्मक ताकदीची खरी कसोटी आहे. "मतदार यादी ही ग्राम पातळीचे राज्य स्तरापर्यंत च्या निवडणुकीची विजयाची शिदोरी आहे. एकही हक्काचा मतदार वंचित राहू नये आणि एकही बनावट नाव शिल्लक राहू नये, यासाठी प्रत्येक बीएलएने रणांगणात उतरावे," असे स्पष्ट आणि ठाम प्रतिपादन राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले.

धरणगाव तालुक्यातील पाळधी येथील सुगोकी लॉन येथे आयोजित मतदार यादी शुद्धीकरण (SIR) अभियानांतर्गत बीएलए प्रशिक्षण कार्यक्रमात ते मार्गदर्शन करत होते. यावेळी त्यांनी कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधत सांगितले की, बूथ हा पक्षाचा कणा आहे. बूथ मजबूत असेल तर निवडणूक आपोआप जिंकली जाते. त्यामुळे प्रत्येक बीएलएने आपल्या बूथचा सखोल अभ्यास करून, घराघरात जाऊन मतदारांची अचूक माहिती संकलित करावी. BLO सोबत समन्वय ठेवा, नवीन मतदार जोडण्यावर भर द्या आणि चुकीच्या नोंदी तातडीने दुरुस्त करा. जोपर्यंत प्रत्येक पात्र मतदार नोंदवला जात नाही, तोपर्यंत विश्रांती नाही.

असे आवाहन त्यांनी केले. या अभियानाला अधिक परिणामकारक करण्यासाठी पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या नेतृत्वात शिवसेनेकडून तालुकास्तरावर नियोजनबद्ध मोहीम राबविण्यात येत असून प्रत्येक कार्यकर्त्याने यामध्ये सक्रिय सहभाग नोंदवावा, असेही त्यांनी स्पष्ट केले. बीएलएंना प्रोत्साहनपर मानधन देण्याचा निर्णयही त्यांनी जाहीर करत कार्यकर्त्यांचा उत्साह वाढविला. प्रास्ताविकात जिल्हा परिषद सदस्य प्रतापराव पाटील यांनी SIR अभियानाचे महत्त्व अधोरेखित करत हे अभियान १०० टक्के यशस्वी करण्यासाठी सूक्ष्म नियोजन करावे असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी सभापती मुकुंदराव नन्नवरे यांनी केले तर आभार माजी सभापती सचिन पवार यांनी मानले. प्रशिक्षण शिबिरात SIR अभियानाचे महत्त्व, मतदार पडताळणीची पद्धत, डिजिटल मॅपिंग आणि बूथनिहाय नियोजन याबाबत SIR तज्ञ मार्गदर्शक प्रथमेश मोहोळ यांनी BLA यांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. या शिबिरात शंकाचे निरसन ही करण्यात आले.

### यांची होती उपस्थिती

शिबिराला तालुका प्रमुख डी. ओ. पाटील, माजी सभापती मुकुंदराव नन्नवरे, जिल्हा परिषद सदस्य प्रतापराव पाटील, सचिन पवार, तालुका संघटक रवी चव्हाण सर, विधानसभा क्षेत्र प्रमुख संजय पाटील, शहर प्रमुख धीरेंद्र पुर्भे, उप सभापती विजय महाजन, शेतकी संघाचे गजानन पाटील, शरद पाटील यांच्यासह धरणगाव तालुक्यातील शिवसेनेचे बी एल ए. पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जन सम्राट टाईम्स — विशेष बातमी

# "शरद पवारांचा तो लेख अत्यंत चुकीचा"

## मुख्यमंत्री फडणवीसांचं मोठं वक्तव्य

जन सम्राट टाईम्स



**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या एका वक्तव्यावरून सध्या राजकीय वाद निर्माण झाला आहे. वारकरी संप्रदायासारख्या समतेच्या चळवळीत आता प्रतिगामी विचारांच्या लोकांनी घुसखोरी केल्याचं मत मांडत धर्मांध शक्तींना बळ देणाऱ्या लोकांची आम्ही यादी तयार करायला सुरुवात केल्याचं भाष्य शरद पवार यांनी महिला शासकीय अधिकाऱ्यांच्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या निमित्त प्रकाशित स्मरणिकेत केलं. मात्र, शरद पवारांच्या या वक्तव्यावरून भाजपाने त्यांच्यावर जोरदार टीका केली आहे. यावर आता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही प्रतिक्रिया देत मोठं भाष्य केलं आहे. 'शरद पवारांचा तो लेख अत्यंत चुकीचा आहे आणि मला अतिशय दु:ख आहे की शरद पवारांनी अशा प्रकारचा लेख लिहिला', असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. तसेच 'शरद पवारांचा वारकरी विचारांशी संबंध राहिलेला नाही', अशी टीकाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शरद पवार यांच्यावर केली. ते दिल्लीत माध्यमांशी बोलत होते."शरद पवार यांचं महाराष्ट्राच्या विकासात योगदान असलं तरीही वारकरी विचारांशी त्यांचा फार संबंध राहिलेला नाही. कारण ज्या प्रकारची चळवळ या महाराष्ट्रात त्यांनी उभी केली किंवा त्यांच्या अनुयायांनी उभी केली ही चळवळ एक प्रकारे निधर्मी अशी चळवळ होती. याबाबत त्यांनी स्वत:ही अनेकदा सांगितलेलं आहे की, ते निधर्मी आहेत. ते धर्म मानत नाहीत किंवा त्यांचा जो पिंड आहे तो निधर्मी आहे. त्यामुळे मला असं वाटतं की वारकरी संप्रदायाच्या संदर्भात त्यांच्याजवळ योग्य माहिती नसावी", असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

### वारकरी विचार हा श्रद्धेचा विचार

मध्यंतरीच्या काळात हा प्रयत्न झाला की वारकरी संप्रदायामध्ये काही लोकांनी शिरकाव करून जो वारकरी विचार आहे, त्या विचाराच्या विरोधात विचार मांडण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे अशा लोकांना वारकरी संप्रदायाने बाहेर काढलं. आपण एक लक्षात घेतलं पाहिजे की हजारो वर्षांची जी समृद्ध परंपरा आहे आणि आपण किमान आठशे ते नऊशे वर्षांचा इतिहास बघितला तर वारकरी विचार हा श्रद्धेचा विचार आहे. वारकरी विचार हा बंधुतेचा विचार आहे. तसेच वारकरी विचार हा भागवत धर्माची पताका घेणाऱ्या व्यक्तीच्या मनाची शुद्धता झाली पाहिजे.

# क्रीडा स्पर्धेत भैरवी गोसावीची चमकदार कामगिरी

जन सम्राट टाईम्स

जळगाव : राज्य शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा कार्यालय, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जळगाव महानगरपालिका शालेय क्रीडा स्पर्धा २०२५-२६ मध्ये बालविश्व प्राथमिक शाळेची विद्यार्थिनी कु. भैरवी मुकुंद गोसावी हिने उल्लेखनीय कामगिरी करत आपली छाप उमटवली आहे. जिल्हा क्रीडा संकुल मैदान तसेच शहरातील विविध नामांकित शाळांमध्ये पार पडलेल्या या स्पर्धांमध्ये भैरवीने ४४ किलो वजन गटात विविध क्रीडा प्रकारांमध्ये सहभाग घेत उत्कृष्ट यश मिळवले. विशेष म्हणजे ज्युडो स्पर्धेत तिने प्रथम क्रमांक पटकावत सुवर्ण कामगिरी केली. तिच्या या यशामुळे शाळा व परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. याशिवाय बॉल बॅडमिंटन स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवत तिने आपली बहुआयामी क्रीडाप्रतिभा सिद्ध केली. तसेच धनुर्विद्या प्रकारातही चतुर्थ क्रमांक मिळवत तिने सातत्यपूर्ण कामगिरीचे दर्शन घडवले. एका विद्यार्थिनीने विविध क्रीडा प्रकारांमध्ये



अशी उल्लेखनीय कामगिरी करणे हे कौतुकास्पद मानले जात आहे. भैरवी गोसावी हिला केवळ या स्पर्धांपुरतेच नव्हे, तर यापूर्वीही लाठी-काठी, तलवार चालवणे यांसारख्या पारंपरिक क्रीडा प्रकारांमध्येही प्राविण्य मिळाले आहे. तिच्या या सर्वांगीण क्रीडा कौशल्यामुळे ती भविष्यात राज्य व राष्ट्रीय स्तरावर नक्कीच झळकणार, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. भैरवीच्या या यशाबद्दल तिचे पालक, शिक्षक तसेच क्रीडा प्रशिक्षकांनी तिचे अभिनंदन केले आहे. तिच्या मेहनतीला आणि जिद्दीला मिळालेल्या या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही क्रीडाक्षेत्रात प्रोत्साहन मिळत आहे. शाळेच्या वतीनेही भैरवीचा गौरव करण्यात येणार असून, भविष्यात अशाच प्रकारे उत्तुंग यश संपादन करण्यासाठी तिला शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

# मुंबई – बंगळुरू वंदे भारत शयनयानला हिरवा कंदील

जन सम्राट टाईम्स

मुंबई : देशभरात 'वंदे भारत' एक्स्प्रेसच्या यशानंतर आता लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी प्रवाशांना शयनयान (स्लीपर) सुविधा असलेली वंदे भारत उपलब्ध करण्यात आली आहे. मुंबई – बंगळुरू वंदे भारत शयनयान एक्स्प्रेसला मंजुरी देण्यात आल्याची घोषणा केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी केली. ही देशातील दुसरी वंदे भारत शयनयान एक्स्प्रेस ठरणार आहे. ही अत्याधुनिक एक्स्प्रेस केएसआर बंगळुरू सिटी रेल्वे स्थानक ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) दरम्यान धावणार आहे. सध्या रेल्वेने वेळापत्रक जाहीर केले नसले तरी मुंबई – बंगळुरू प्रवास १६ तासांपेक्षा कमी वेळेत पूर्ण होईल, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

# घरकुलाचा गैरवापर; सलून दुकान थाटल्याचा प्रकार

## कार्यकारी अधिकाऱ्यांचे कारवाईचे आदेश

जन सम्राट टाईम्स




**एरंडोल :** जळगाव जिल्ह्यातील रवंजे बुद्रुक येथे शासनाच्या घरकुल योजनेचा गैरवापर झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. आर्थिक दुर्बल घटकांसाठी उभारण्यात आलेल्या घरकुलाचा वापर राहण्यासाठी न करता त्यामध्ये थेट सलून दुकान सुरू केल्याची तक्रार करण्यात आली आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी बी.एस. अकलाडे यांनी चौकशी करून तात्काळ कारवाईचे आदेश दिले आहेत. शासनाकडून गरजू नागरिकांना निवारा उपलब्ध व्हावा या उद्देशाने घरकुल योजना राबवली जाते. मात्र काही ठिकाणी या योजनेचा गैरवापर होत असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. रवंजे बुद्रुक येथे संबंधित लाभार्थ्याने घरकुल बांधल्यानंतर त्याचा वापर सलून व्यवसायासाठी केल्याची बाब समोर आली आहे. तक्रारदार दयाराम राजधर नन्नवरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, शौचालयातील घाण पाणी भिंतीतून झिरपत असून परिसरात तीव्र दुर्गंधी पसरत आहे. यामुळे कुटुंबीयांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असून राहणेही कठीण झाले आहे. या संदर्भात त्यांनी ग्रामपंचायत स्तरावर २१ एप्रिल २०२५ रोजी तक्रार दाखल केली होती. मात्र, त्यानंतरही कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे.यानंतर नन्नवरे यांनी एरंडोल पंचायत समितीचे गटविकास अधिकारी तसेच जिल्हा परिषद ग्रामपंचायत विभागाकडे तक्रार केली. गटविकास अधिकाऱ्यांकडून चौकशीही करण्यात आली, मात्र त्यानंतरही कारवाईला विलंब होत असल्याने तक्रारदारांनी थेट जिल्हा परिषदेकडे धाव घेतली.

### प्रशासनाची जबाबदारी वाढली

वर्षभरापासून तक्रारीनंतरही ठोस कारवाई न झाल्याने तक्रारदार नन्नवरे यांनी संताप व्यक्त केला आहे. "संबंधितांवर कारवाई झाली नाही तर आत्मदहनाचा मार्ग स्वीकारावा लागेल," असा इशाराही त्यांनी दिला आहे. या इशाऱ्यामुळे प्रशासनाची जबाबदारी आणखी वाढली असून, आता या प्रकरणात नेमकी काय कारवाई होते.

# शैक्षणिक उपक्रमांनी साजरी करा डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती


## महिनाभर गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वितरण; अनावश्यक खर्च टाळून शिक्षणाला द्या प्राधान्य

जन सम्राट टाईम्स

मुंबई : महामानव प्रतिष्ठान आणि 'एक वही एक पेन' अभियानाच्या वतीने यंदाची डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती शैक्षणिक उपक्रमांनी साजरी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

समाजातील आर्थिक दुर्बल तसेच आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी या अभियानाअंतर्गत महिनाभर विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. आजच्या काळात महापुरुषांच्या जयंती, महापरिनिर्वाण दिन, सार्वजनिक उत्सव किंवा वाढदिवस यानिमित्त मोठ्या प्रमाणात आर्थिक खर्च केला जातो. मात्र या खर्चातील काही भाग समाजोपयोगी कार्यासाठी वापरला, तर अनेक गरजू विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल होऊ शकते, असा संदेश या अभियानातून देण्यात येत आहे.

अभियानाच्या माध्यमातून 'एक वही एक पेन' या संकल्पनेतून विद्यार्थ्यांना वह्या, पेन, पुस्तके, दप्तरे यांसारखे शैक्षणिक साहित्य



देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. याशिवाय, शक्य असल्यास विद्यार्थ्यांना दत्तक घेणे, विनामूल्य स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन (एमपीएससी-युपीएससी) वर्ग सुरू करणे, तसेच शाळा व वस्त्यांमध्ये Dr. Babasaheb Ambedkar यांच्या शैक्षणिक प्रवासावर आधारित निबंध व वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्याचेही आवाहन करण्यात आले आहे.

याचबरोबर छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज, महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले, राजमाता जिजाऊ आणि रमाई यांसारख्या महापुरुष व महामातांच्या जयंतीनिमित्तही शैक्षणिक साहित्य देऊन अभिवादन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### शैक्षणिक साहित्याचे वितरण

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती देशासह परदेशातही मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. या पार्श्वभूमीवर यंदा जयंती केवळ उत्सवापुरती मर्यादित न ठेवता ती सामाजिक परिवर्तनाचा संदेश देणारी ठरावी, असा उद्देश अभियानामागे आहे. या उपक्रमाअंतर्गत मुंबईसह राज्यातील दुर्गम व आदिवासी भागांमध्ये महिनाभर शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात येणार आहे. या अभियानात सहभागी होण्यासाठी किंवा साहित्य देण्यासाठी इच्छुकांनी ९३७२३४३१०८ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन अभियानाचे प्रणेते Raju Jhanke यांनी केले आहे.

अभियानाच्या आयोजकांनी नागरिकांना सुस्थितीत असलेले जुने मोबाईल, संगणक, लॅपटॉप, कपडे यांचेही दान करण्याचे आवाहन केले आहे. हे साहित्य संबंधित पुतळा समित्या किंवा सामाजिक संस्थांच्या माध्यमातून गरजू विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे.

# क्रांतीसूर्य महात्मा फुलेंना समताभूमीत अभिवादन!

## गंजपेठेतील महात्मा फुले वाडा येथे जन्मदिनानिमित्त अभिवादन

जन सम्राट टाईम्स

पुणे प्रतिनिधी | एस. एन. नांदेडकर पुण्यातील गंजपेठ परिसरातील ऐतिहासिक महात्मा फुले वाडा (समताभूमी) येथे क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. सामाजिक समतेचा संदेश देणाऱ्या या पवित्र स्थळी विविध स्तरांतील कार्यकर्त्यांनी उपस्थित राहून फुलेंच्या विचारांना वंदन केले. यावेळी "आम्ही भारताचे लोक" आंबेडकरी सांस्कृतिक चळवळीच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. फुले यांच्या कार्याची आठवण करून देत त्यांच्या समतेच्या,




शिक्षणाच्या आणि सामाजिक न्यायाच्या विचारांचा जागर करण्यात आला. या कार्यक्रमाला आंबेडकरी सांस्कृतिक चळवळीचे प्रतिनिधी समाधान मस्के, राज्य प्रतिनिधी संघशिल भद्रे, अँड. संघपाल घोडकुंबे, पूनम घोडकुंबे, कांचन शिवशरण तसेच अंगणवाडी शिक्षिका सुनिताताई बेटमोगरेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांनी महात्मा फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तसेच त्यांच्या कार्याचा वारसा पुढे नेण्याचा निर्धार व्यक्त केला. समाजातील वंचित घटकांसाठी शिक्षणाचे दरवाजे खुले करणारे, स्त्री-पुरुष समानतेचा पुरस्कार करणारे आणि अंधश्रद्धेविरुद्ध लढा देणारे महात्मा फुले यांचे कार्य आजही प्रेरणादायी असल्याचे यावेळी वक्त्यांनी नमूद केले. कार्यक्रमादरम्यान सामाजिक समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांची जपणूक करण्याचे आवाहन करण्यात आले. फुले यांच्या विचारांनी प्रेरित होऊन समाजात सकारात्मक बदल घडवण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घेणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. या अभिवादन सोहळ्यामुळे समताभूमी परिसरात प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले असून, फुले यांच्या विचारांची ज्योत पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवण्याचा संकल्प उपस्थितांनी व्यक्त केला.

# सह्याद्री एक्स्प्रेसमधील प्रवाशांची लूट

जन सम्राट टाईम्स

सांगली : रेल्वेच्या सिग्नल यंत्रणेत बिघाड करुन सह्याद्री एक्स्प्रेसमधील प्रवाशांना लुटण्याचा प्रकार शनिवारी पहाटे शेणोली (ता. कराड) येथे घडला असून याबाबत मिरज लोहमार्ग पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्याचे काम रात्री उशिरापर्यंत सुरू होते. कोल्हापूरहून मध्यरात्री पुण्याला निघालेल्या सह्याद्री एक्स्प्रेसवर कराड तालुक्यातील शेणोली स्टेशनजवळ लुटालूट झाली आहे. सातारा व सांगली जिल्हा सीमेवर काही अंतरावर मध्यरात्री दोन ते अडीच वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली आहे. सिग्नलशी संशयितांनी छेडछाड करत हा सिग्नल बंद पाडला होता. सिग्नल बंद असल्याने रेल्वे थांबल्याचे पाहून संशयितांनी रेल्वे डब्यात शिरुन प्रवाशांचे सोने व मोबाईल लंपास केले आहेत. काही प्रवाशांनी चोरट्यांना रोखण्याचा प्रयत्न केला, मात्र हत्यारांचा धाक दाखवत लूट करण्यात आली. या घटनेची माहिती समजताच मिरज लोहमार्ग रेल्वे पोलिसांना मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. मात्र तत्पूर्वी चोरट्यांनी पलायन केले. पोलीसांनी चोरट्यांचा तपास सुरू केला आहे. या घटनेनंतर सह्याद्री एक्स्प्रेस विलंबाने पुण्याच्या दिशेने रवाना झाली.

जन सम्राट टाईम्स — अँकर न्यूज

# एप्रिल-जून अन्नधान्याचे आगाऊ वितरण वेगात; राज्यभर प्रक्रिया प्रभावीपणे सुरु

## राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत पात्र लाभार्थ्यांना वेळेत धान्य

जन सम्राट टाईम्स

मुंबई : केंद्र शासनाच्या निर्देशानुसार एप्रिल ते जून २०२६ या कालावधीतील अन्नधान्याचे आगाऊ वितरण राज्यभर युद्धपातळीवर सुरू करण्यात आले आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत एकही पात्र लाभार्थी वंचित राहू नये, यासाठी राज्य शासनाने काटेकोर नियोजन करत सर्व यंत्रणा सज्ज केल्या आहेत, अशी माहिती अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने दिली. केंद्र शासनाने दि. २ मार्च



२०२६ रोजी दिलेल्या निर्देशानंतर राज्यात तातडीने पूर्वतयारी सुरू करण्यात आली. त्यानुसार दि. ९ मार्च रोजी नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा यांच्या अध्यक्षतेखाली व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे बैठक घेऊन आगाऊ उचल, साठा व्यवस्थापन आणि वितरण यंत्रणा मजबूत करण्याबाबत सविस्तर चर्चा झाली. या बैठकीतील निर्णयांची अंमलबजावणी करण्यासाठी दि. १० मार्च रोजी सर्व जिल्ह्यांना स्पष्ट सूचना देण्यात आल्या. त्यानंतर Food Corporation of India (एफसीआय) च्या माध्यमातून दि. ११ मार्च रोजी आणखी एक महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात आली. पुढे १७ आणि २४ मार्च रोजी जिल्हास्तरावर अन्नधान्य उचल व वितरण प्रक्रियेसाठी मार्गदर्शक तत्त्वे देण्यात आली. या प्रक्रियेचा आढावा केंद्र शासनानेही घेतला असून ६ आणि ७ एप्रिल रोजी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे प्रगतीची समीक्षा करण्यात आली.

### वाहतूक व्यवस्थेला विशेष प्राधान्य

अंमलबजावणीदरम्यान येणाऱ्या अडचणी तातडीने सोडवण्यासाठी ८ एप्रिल रोजी एफसीआयच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत विशेष बैठक घेण्यात आली. याच दिवशी सर्व जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना एप्रिल ते जून या तीन महिन्यांचे अन्नधान्य ३० एप्रिलपर्यंत उचलून वितरण पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. वाहतूक व्यवस्थेलाही विशेष प्राधान्य देण्यात आले असून संबंधित कंत्राटदारांना आवश्यक तेवढी वाहने उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

# शेतकऱ्यांचे श्रीरामपूरमध्ये जेलभरो आंदोलन

## पोलीस ठाण्याच्या आवारात मांडल्या चुली

जन सम्राट टाईम्स

श्रीरामपूर तालुक्यातील ९ गावातील शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनी राज्य सरकार देत नसल्याच्या निषेधार्थ शेतकरी संघटना व आकारी पीडित शेतकरी संघर्ष समितीच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यासमोर चुली मांडून आज, शनिवारी जेलभरो आंदोलनाला सुरुवात केली होती. मात्र रात्री उशिरा पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या मध्यस्थीने महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आकारी पीडित शेतकऱ्यांच्या प्रश्नावर २३ एप्रिलला मुंबईत बैठक आयोजित करण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आल्याची माहिती शेतकरी संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष अॅड. अजित काळे यांनी दिली. मुंबईत होणाऱ्या बैठकीसाठी आंदोलक शेतकऱ्यांच्या पाच प्रतिनिधींना निमंत्रित करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. पालकमंत्री विखे त्यांच्या सूचनेनुसार भाजपचे जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, तालुकाध्यक्ष बाबासाहेब चिडे, शहराध्यक्ष जितेंद्र छाजड, गटनेत्या वैशाली चव्हाण, नगरसेवक दीपक चव्हाण व बंडू शिंदे यांच्या शिष्टमंडळाने आंदोलक शेतकऱ्यांची भेट घेतली. आकारी पडीत शेतकऱ्यांच्या वारसांना जमीनवाटप न्यायालयाच्या निकालानंतरही रखडले असल्याने या जमिनींचे मूळ मालक असलेले आंदोलक शेतकरी संतप्त झाले होते. शेतकरी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष अॅड. अजित काळे यांच्या नेतृत्वाखाली सूरू असलेल्या आंदोलनाचा हा दुसरा टप्पा होता. आपल्या हक्कांच्या जमिनी सरकारकडून परत मिळवण्यासाठी शेतकऱ्यांचा सुरू असलेल्या या संघर्षाने राज्याचे लक्ष वेधून घेतले.आज आकारी पीडित शेतकऱ्यांनी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यासमोरच चुली मांडून त्यावर स्वयंपाक सुरू केला. आपली गुरेढोरे पोलीस ठाण्याच्या आवारात बांधली. या आंदोलनात महिलांचा सहभाग लक्षणीय होता. पोलीस प्रशासनाने कायदा व सुव्यवस्थाचे कारण देत आंदोलकांना कलम १६८ अन्वये नोटिसा बजावल्या होत्या, परंतु शेतकऱ्यांनी त्यांना न जूमानता पोलीस ठाण्याच्या आवारात आंदोलन सुरू केले.